महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.
चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -411008
दुरध्वनी क्रमांक-020- 25657878 फॅक्स क्रमांक-020-25674641
ई मेल- sp.pune.r @maha.gov.in.

पुणे ग्रामीण पोलीस शिपाई चालक भरती २०२४-२५
मैदानी चाचणी, व लेखी परिक्षा यांची एकत्रित गुणवत्ता यादी
-: उमेदवारांना महत्वाची सूचना :-

पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर सन २०२४-२५ मध्ये रिक्त असलेल्या एकुण ०३ पोलीस शिपाई पदांकरिता मैदानी चाचणी घेण्यात आलेली आहे. सदर चाचणीमध्ये गुणवत्तेनुसार व रिक्त पदांच्या १:१० प्रमाणे लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या ६३ उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक ०५.०४.२०२६ रोजी घेण्यात आलेली आहे. त्यामध्ये उमेदवार मैदानी चाचणी, व लेखी परिक्षेमध्ये मिळालेले गुण एकत्र करुन एकत्रित गुणवत्ता यादी या कार्यालयाच्या **www.puneruralpolice.gov.in** तसेच, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीस्तव प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर यादीतील उमेदवारांनी आपणास मैदानी चाचणी व लेखी परिक्षेमध्ये प्राप्त गुणांची पडताळणी करुन त्यावावत काही हरकती किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी त्यांचे आक्षेप दिनांक १०.०४.२०२६ रोजी दुपारी १३:०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या पोलीस भरती समाधान कक्ष, व्हाट्सअप मोबाईल क्र.८६६९६०३१३१ पाठविण्यावावत कळविण्यात आलेले होते. परंतु तंत्रिक कारणामुळे तो मोबाईल क्र.८६६९६०३१३१ हा बंद असल्याने त्या मोबाईल क्र. ऐवजी नविन मोबाईल क्र. ९२७२५०४३५५ वर उमेदवारांचे नव्याने आक्षेप/ हरकती दिनांक ११.०४.२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत पाठवाव्यात व ई-मेल आयडी sp.pune.r@mahapolice.gov.in यावर लेखी स्वरुपात सविस्तर नोंद करु शकतात. उमेदवारांने आक्षेप / हरकती घेतांना स्वत:चे संपूर्ण नाव, आवेदन अर्ज क्रमांक, चेस्ट क्रमांक व मोबाईल क्रमांक तसेच आक्षेप इत्यादी स्पष्ट नमूद करुन पाठवावेत.

ठिकाण :- पुणे ग्रामीण
दिनांक :- १०.०४.२०२६

(दिलीप शिंदे)
पोलीस उप अधीक्षक, (मुख्यालय)
पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.